# मिरा भाईदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

## मान्सुनपुर्व शहर स्वच्छता मोहीम

मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या आदेशान्वये अति. आयुक्त अनिकेत मानोरकर व मा. उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक **24/05/2024** रोजी मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत **सखोल स्वच्छता अभियान (भाग- 03)** मान्सूनपूर्व शहर स्वच्छता अभियान राबविण्यात आले सदर मोहीम अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील **प्रभाग समिती क्र. 6** यामध्ये मान्सूनपूर्व शहर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता अशी असंख्य कामे सकाळी 7.00 ते 10.00 वाजेपर्यंत करून घेतली. मा. अति. आयुक्त व मा. उपायुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्ता सफाई मोहीम राबवली. तसेच परिसरात भेट देऊन अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" मोहिमेमध्ये **प्रभाग समिती क्र.** 6 मधील एकूण 09 किलोमीटर मुख्य व अंतर्गत रस्ते यांची साफसफाई करण्यात आली. **500 Kg** डस्ट साफ करण्यात आली, **2000 Kg** सुका कचरा गोळा करण्यात आला. रस्त्यालगतच्या झाडांची छाटणी करून **1000 kg** कचरा गोळा करण्यात आला. सदर मोहिमे दरम्यान एकूण **15** थुंकलेल्या जागा साफ करण्यात आल्या **100** जागी चिटकवण्यात आलेले स्टिकर्स साफ करण्यात आले. तसेच शहरांमध्ये लागलेले **5** अनधिकृत बोर्ड काढण्यात आले. सदर मोहिम दरम्यान शहरांमध्ये रस्त्यावर अस्वच्छता पसरवणाऱ्या आस्थापनेवर दंडात्मक कारवाई करून **रु.25000/- दंड** वसूल करण्यात आला तसेच सिंगल युज प्लास्टिक वापर करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. तसेच दि. 25/05/2024 रोजी प्रभाग समिती क्र. 04 मध्ये सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य)
मिरा भाईदर महानगरपालिका